सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

E-Mail : prajasattaknews24@gmail.com | RNI No. - MAHMAR 2023/84526 | Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ४ थे ❑ अंक - १३० वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ गुरुवार दि. २ जुलै २०२६ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -४

## भारत-पाकिस्तान फाळणीवरून आरएसएस प्रमुखांनी पुन्हा सुनावले

### भारतात आलेल्यांबद्दल ही चुकच झाली, ते शरणार्थी नाही तर संघर्षयोद्धे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२ नागपूर**

भारत आणि पाकिस्तानच्या फाळणीला राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा कायमच विरोध राहिलेला आहे. सरसंघचालक मोहन भागवत यांनी अनेकदा आपल्या भाषणातून फाळणीला विरोध दर्शवला. अशातच नागपूरमध्ये झालेल्या एका कार्यक्रमात भागवत यांनी फाळणीविषयी महत्त्वाचे विधान केले.

फाळणीनंतर भारतात आलेल्या लोक शरणार्थी नव्हते, तर मातृभूमी आणि धर्मावरील प्रेमामुळे विस्थापित झालेले संघर्षयोद्धे होते. ते त्यांचे भविष्य, संपत्ती आणि सर्वस्व मागे सोडून भारतात आले व नव्याने जीवन उभारले. त्यांच्यासाठी शरणार्थी या चुकीच्या शब्दाचा वापर झाला, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी केले.

सिंधू एज्युकेशन सोसायटीच्या स्थापनेला ७५ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी संस्थेच्या



पदाधिकारी डिम्पी बजाज उपस्थित होत्या.

संस्थेच्या ७५ वर्षांच्या प्रवासाचा उल्लेख करताना भागवत म्हणाले, अशा टप्प्यांमुळे संस्थेच्या कार्याचा आढावा घेण्याची आणि आपल्या उद्दिष्टांचे स्मरण करण्याची संधी मिळते. काळ बदलला असला तरी कार्यामागील निष्ठा आणि उद्देश बदलू नयेत. जीवनात संकटे आली तरी खचून जाऊ नका, प्रयत्न करणारा माणूसच यश मिळवतो, तर संकटांपासून पळ काढणारा आधीच पराभूत होतो. सुख आणि दुःख या दोन्ही अवस्थांकडे समतोल दृष्टीने पाहण्याची गरज असल्याचे सांगत त्यांनी दुःखातही आशेचा किरण शोधण्याचा सल्ला दिला.

शिक्षणाविषयी बोलताना भागवत यांनी रोजगारासाठीचे शिक्षण महत्त्वाचे असले तरी तेच अंतिम ध्येय नसल्याचे स्पष्ट केले. मनुष्याला विवेक, चांगले-वाईट यातील फरक समजून घेण्याची क्षमता विकसित करण्यासाठी मूल्याधिष्ठित शिक्षण आवश्यक आहे. हे शिक्षण केवळ पाठ्यपुस्तकांतून मिळत नाही, तर शिक्षकांच्या आचरणातून आणि संस्कारांतून मिळते, असे भागवत यांनी सांगितले. चांगले मनुष्य बनणे आणि समाजहिताची जाणीव असलेली पिढी घडवणे, हाच शिक्षणाचा खरा उद्देश असल्याचे ते म्हणाले.

## गणेशोत्सवात यंदातरी पीओपी बंदी लागू करणार की नाही?

### हायकोर्टाचा राज्य सरकारला सवाल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२मुंबई-** सहा फुटांवरील गणेशमूर्तींचे नैसर्गिक जलस्त्रोतांमध्ये, तर त्यापेक्षा कमी उंचीच्या मूर्तींचे कृत्रिम तलावात विसर्जन करण्याची परवानगी यंदाही द्यावी, अशी विनंती राज्य सरकारने उच्च न्यायालयाला केली. गेल्यावर्षी केंद्रीय प्रदूषण नियामक मंडळाने पीओपी मूर्तींबाबत बदललेली भूमिका आणि राज्य सरकारने १ ऑगस्ट २०१५ रोजी मूर्तींच्या विसर्जनाबाबत काढलेल्या अधिसूचनेला पर्यावरणप्रेमी रोहित जोशी यांनी आव्हान दिले आहे. या याचिकेवरील सुनावणी न्या. अजय गडकरी व न्या. कमल खाता यांच्या खंडपीठापुढे सुनावणी होती.साठवून ठेवलेल्या मूर्तींची विल्हेवाट लावण्यासंदर्भात वैज्ञानिक आणि



तांत्रिक समितीच्या शिफारशींवर टप्प्याटप्प्याने अंमल करायचा आहे.

मुंबई, नवी मुंबई, पुणे, छत्रपती संभाजी नगर, नाशिक अशा ७ - ८ ठिकाणी गणेशमूर्तींचे पुनर्वापर करण्याचा प्रकल्प हाती घ्यायचा आहे. त्यामुळे गेल्यावर्षीची पद्धत यंदाही राबवू द्या, अशी विनंती महाअधिवक्ता मिलिंद साठे यांनी न्यायालयाला केली.

याचिकाकर्त्यांच्या वतीने ज्येष्ठ वकील मिहीर देसाई यांनी आक्षेप घेतला. राज्य सरकार दरवेळी काही ना काही सबब देऊन अंमलबजावणीसाठी विलंब करेल. दरवर्षीच मुदतवाढ मागतील. हे पर्यावरणासाठी हानिकारक आहे. त्यामुळे त्यांना मुदतवाढ देऊ नये, असे देसाई यांनी न्यायालयाला सांगितले.

न्यायालयानेही त्यांच्या या मतावर सहमती दर्शवत सरकारकडे विचारणा केली की, शाडूच्या मूर्ती बनविण्यासाठी आवश्यक असलेली सामग्री अपुरी आहे का? त्यावर सरकारने तशी स्थिती नसल्याचे सांगितले. वास्तविकता, शाडूच्या मोठ्या मूर्ती बनू शकत नाहीत. एक, दीड फुटाच्याच मूर्ती घडवता येतील.

मोठ्या मूर्ती बनवल्यास त्यांना तडे जाण्याची शक्यता असते आणि त्या दहा दिवस टिकू शकत नाही. नागरिकांच्या भावनेचा प्रश्न आहे, असे मूर्तिकार संघटनांच्या वतीने ड. उदय वारुंजीकर यांनी न्यायालयाला सांगितले कि पुढील सुनावणी दोन आठवड्यांनी होईल.

## तू केवळ राबणारी महिला नाहीस, आता शेतकरी आहेस

### विधानसभेत ऐतिहासिक 'महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयक २०२६' सादर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२मुंबई** शेतात पुरुषांच्या बरोबरीने राबणाऱ्या पण जमिनीवर नाव नसल्याने 'शेतमजूर' ठरवल्या जाणाऱ्या महिलांना आता हक्काची आणि कायदेशीर ओळख मिळणार आहे.

राज्याचे कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात 'महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयक २०२६' मांडले. हरितक्रांतीचे प्रणेते स्वर्गीय वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त (कृषी दिन) हे ऐतिहासिक विधेयक सादर करण्यात आले असून, महिला शेतकऱ्यांसाठी असा स्वतंत्र कायदा करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले आहे.

या विधेयकाचा मसुदा देवेंद्र फडणवीस यांच्या थेट देखरेखीखाली तयार करण्यात आला असून, महिलांना आर्थिकदृष्ट्या आत्मनिर्भर करून शेती क्षेत्राचा चेहरामोहरा बदलण्याचा या कायद्याचा मुख्य हेतू आहे.

**विधेयकातील प्रमुख वैशिष्ट्ये आणि तरतुदी -** शेतीची अत्यंत व्यापक व्याख्या: या विधेयकात शेतीच्या व्याख्येचा



विस्तार करण्यात आला आहे. केवळ पीक उत्पादनच नव्हे, तर पशुपालन, कुक्कुटपालन, दुग्ध व्यवसाय, मत्स्यपालन, मधमाशी पालन आणि वनोपज संकलन (तेंदूपत्ता, डिंक गोळा करणे) या सर्व व्यवसायांचा शेतीत समावेश करण्यात आला आहे. यामुळे जमिनीची मालकी नसली, तरी शेतीशी निगडित काम करणाऱ्या महिलेला 'शेतकरी' म्हणून मान्यता मिळेल.

**महिला शेतकरी ओळखपत्र:** ग्रामसभेच्या माध्यमातून महिलांना अधिकृत 'महिला शेतकरी ओळखपत्र' दिले जाईल. या प्रक्रियेत काही अडचण आल्यास तालुका कृषी अधिकाऱ्यांकडे अपील करण्याची सुविधा असेल.

**थेट लाभ आणि कर्जपुरवठा:** ग्रामसभेच्या माध्यमातून दिल्या जाणाऱ्या ओळखपत्राच्या माध्यमातून महिलांना कृषी कर्ज, बी-बियाणे, खते, विविध शासकीय योजनांचे अर्थसहाय्य आणि बाजारपेठेत थेट प्रवेश मिळेल.

स्वतंत्र निधी आणि डेटाबेस: महिला शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणासाठी स्वतंत्र निधीची तरतूद करण्यात आली आहे. तसेच, त्यांच्या गरजेनुसार योजना राबवण्यासाठी महिला शेतकऱ्यांचा एक स्वतंत्र 'डेटाबेस' तयार केला जाईल.

एकल महिलांसाठी विशेष साहाय्य: एकल महिला शेतकऱ्यांसाठी विशेष साहाय्यता कार्यक्रम आणि कौशल्य विकास योजना या विधेयकाद्वारे राबवल्या जातील. जिल्हा आणि तालुका पातळीवर 'महिला शेतकरी अधिकाऱ्यांची' नियुक्ती केली जाईल.

## वरळी कोणाची हे २०२९ ला कळेल

### शिंदे सेनेच्या नेत्याचा ठाकरेंना अप्रत्यक्ष इशारा



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२मुंबई -** शिवसेना (ठाकरे) पक्षाचे विधानपरिषदेचे आमदार सचिन अहिर यांना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांच्या शिवसेनेत घेत थेट विधानपरिषदेचं उपसभापती केलं आहे. त्यामुळे उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरे यांच्यासाठी हा मोठा धक्का मानला जात आहे. या घडामोडींमुळे आता येत्या विधानसभा निवडणुकीत वरळी विधानसभा मतदारसंघात आदित्य ठाकरेंसाठी मोठं आव्हान उभं राहण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

सचिन अहिर यांनी देखील याबाबत नुकतंच सूचक वक्तव्य केलं होतं. सचिन अहिर यांना वरळी विधानसभा मतदारसंघाबाबत पत्रकारांनी प्रश्न विचारला होता. त्यावर बोलताना त्यांनी म्हटलं होतं की, एकनाथ शिंदे माझ्यावर जी जबाबदारी टाकतील, ती पूर्ण ताकदीने पार पाडण्याचा प्रयत्न करेन. दरम्यान, आता शिंदे सेनेचे नेते तथा मंत्री उदय सामंत यांनीही वरळीवरून थेट ठाकरेंना अप्रत्यक्ष इशारा दिला आहे. 'वरळी कोणाची हे २०२९ मध्ये कळेल', असं उदय सामंत यांनी म्हटलं आहे.सचिन अहिर तुमच्या सेनेत आल्यामुळे तुमच्या पक्षातील अनेक जण नाराज असल्याची चर्चा आहे. यावर तुम्हाला काय वाटतं? असा प्रश्न पत्रकारांनी विचारला. यावर उदय सामंत म्हणाले की, आमच्या पक्षात कोणीही नाराज नाही. उलट आमचे विधानपरिषदेचे आमदार आहेत, त्या आमदारांनी सचिन अहिर यांच्यासारखा एक कामगार नेता, गिरणी कामगारांचा नेता आणि सर्वसामान्यांचा नेता उपसभापती झाल्याबद्दल सर्वांनी आनंद व्यक्त केला आहे. पण आमच्या पक्षात काही जण नाराज झाले या बातम्या मुद्दाम पसरवल्या जात आहेत, यामध्ये काहीही तथ्य नाही, असं उदय सामंत यांनी स्पष्ट केलं आहे.

## मोहित कंबोज दलालच:श्रीकांत शिंदे उद्धव ठाकरेंकडे येऊन कितीवेळा रडलेत हे आम्हाला माहीत - अंबादास दानवे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२ मुंबई-** मोहित कंबोज हा दलाल आहे त्यांच्या विषयी मी परवा बोललो तर भाजपच्या लोकांचेच मला फोन आले की तुम्ही बोललात ते एकदम योग्य बोललात, असे म्हणत उबाठाचे नेते अंबादास दानवे त्यांच्यावर टीका केली आहे. तर श्रीकांत शिंदे हे उद्धव ठाकरे यांच्याकडे येत कितीवेळा रडले हे आम्हाला माहिती आहे. त्यांनी उद्धव ठाकरेंवर बोलूच नये आणि बोलले तरी ती गांभीर्याने घेण्याची गरज नाही, असे म्हटले आहे. अंबादास दानवे म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे कौतुक करायला काही हरकत नाही. पण त्यांचे कौतुक केले म्हणजे त्यांच्या पक्षात गेलो किंवा जायला



पाहिजे असे काही नाही. राज्याचे मुख्यमंत्री चांगले काम करत असतील तर त्यांचे कौतुक करायला काही हरकत नाही. मी तर विरोधी पक्षातील सदस्य आहे. तरीही हरकत असायला काही कारण नाही. अमोल कोल्हे यांच्या पक्षाचे प्रमुख शरद पवार आहेत. त्यांच्या एकट्याच्या वाटण्याने पक्षात काही होणार नाही सर्वांनी मिळून विचार केला तर काही होऊ शकते.

## माहिती अधिकार कायद्यातील वादग्रस्त बदलांना स्थगिती

### मुख्यमंत्री फडणवीसांच्या पुढाकारानंतर राज्य माहिती आयोगाची माघार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२मुंबई**

राज्य सरकारने माहिती अधिकार कायद्यात केलेल्या वादग्रस्त बदलांना अखेर तूर्तास स्थगिती दिली आहे. ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी या बदलांविरोधात आंदोलनाचा इशारा दिल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वतः पुढाकार घेत राज्य माहिती आयोगाशी पत्रव्यवहार केला. त्यानंतर राज्याचे मुख्य माहिती आयुक्तांनी १२ जून रोजी जारी करण्यात आलेल्या सुधारित नियमांना स्थगिती देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे माहिती अधिकार कार्यकर्ते आणि अण्णा हजारे यांच्या आंदोलनाला मोठे यश मिळाल्याचे मानले जात आहे. माहिती अधिकार कायद्यात करण्यात आलेल्या बदलांविरोधात अण्णा हजारे यांनी तीव्र नाराजी व्यक्त करत उपोषणाचा इशारा दिला होता. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणात थेट हस्तक्षेप केला. मुख्यमंत्र्यांनी राज्य माहिती आयोगाला पाठवलेल्या पत्रात,



ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते अण्णा हजारे यांच्याशी या विषयावर सविस्तर चर्चा झाल्याशिवाय कोणताही अंतिम निर्णय घेणे उचित ठरणार नाही, असे स्पष्ट नमूद केले. मुख्यमंत्र्यांच्या या पत्राची दखल घेत राज्य मुख्य माहिती आयुक्तांनी सुधारित नियमांना स्थगिती दिली.राज्य सरकारने १२ जून रोजी माहिती अधिकार कायदा २००५ संदर्भातील सुधारित अधिसूचना प्रसिद्ध केली होती. या अधिसूचनेत अर्ज शुल्कापासून अपील शुल्कापर्यंत अनेक नियमांमध्ये मोठे बदल करण्यात आले होते.

या बदलांमुळे सामान्य नागरिकांना माहिती मिळवणे अधिक खर्चिक आणि क्लिष्ट होईल, असा आरोप माहिती अधिकार कार्यकर्ते आणि विविध सामाजिक संघटनांनी केला होता.अण्णा हजारे यांनीही सरकारवर टीका करत माहिती अधिकार हा नागरिकांचा मूलभूत अधिकार असून तो महसूल मिळवण्याचे साधन बनवू नये, असे स्पष्ट मत व्यक्त केले होते. काही लोक कायद्याचा गैरवापर करत असले तरी संपूर्ण व्यवस्थेवर आर्थिक बोजा टाकणे योग्य नसल्याचे त्यांनी म्हटले होते.सरकारने बदल पूर्ववत न केल्यास उपोषणाचा होता इशाराअण्णा हजारे यांनी सरकारला स्पष्ट इशारा दिला होता की, माहिती अधिकार कायद्यातील हे बदल मागे घेतले नाहीत, तर ते पुन्हा उपोषणाचा मार्ग स्वीकारतील. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री फडणवीस यांनी पुढाकार घेतल्याने सरकारने तात्पुरती माघार घेतल्याचे चित्र आहे.

## बालभारतीच्या अभ्यासक्रमावरून पुन्हा नवा वाद

### सहावीच्या मराठी पुस्तकातून महाराष्ट्राचीच लोकनृत्ये गायब; केवळ परराज्यांतील नृत्यांना स्थान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२पुणे -** राज्यात एका बाजूला शालेय शिक्षणात 'सीबीएसई' पॅटर्न राबवण्यावर आणि मराठी भाषा सक्तीची करण्यावर भर दिला जात आहे. मात्र, दुसरीकडे शिक्षण विभागाच्या गलथान कारभारामुळे महाराष्ट्र आणि मराठी भाषेच्या संदर्भात सातत्याने त्रुटी समोर येत आहेत. आता बालभारतीच्या इयत्ता सहावीच्या मराठी पाठ्यपुस्तकातील एका धड्यावरून नवा वाद उफाळून आला आहे. या पुस्तकातील 'लोकनृत्य' या पाठात महाराष्ट्रातील समृद्ध लोककलांना डावलून परराज्यांतील लोकनृत्यांना अधिक महत्त्व दिल्याचे समोर आले आहे.

इयत्ता सहावीच्या मराठी पाठ्यपुस्तकातील 'लोकनृत्य' या पाठात एकूण पाच लोकनृत्यांची माहिती देण्यात आली आहे. मात्र, यामध्ये महाराष्ट्रातील केवळ एकाच दिंडी या नृत्याचा समावेश करण्यात आला आहे. तर, उर्वरित चार लोकनृत्ये ही इतर राज्यांतील आहेत. या पाठातील लोकनृत्यांमध्ये पंजाबचा भांगडा, गुजरातचे रास-नृत्य, बिहारमधील आदिवासी नृत्य आणि छत्तीसगडमधील बस्तर नृत्य यांचा समावेश करण्यात आला आहे.

महाराष्ट्राला लावणी, लेझीम, धनगरी गजा, गोंधळ, कोळी नृत्य आणि पोवाडा यांसारख्या लोककलांची आणि लोकनृत्यांची मोठी व समृद्ध परंपरा लाभली आहे. सहावीतील विद्यार्थ्यांना राज्याच्या या वैभवशाली सांस्कृतिक परंपरेची ओळख करून देणे अपेक्षित होते.



राज्याच्या विभागानुसार लोकनृत्यांचा समावेश करता आला असता, परंतु तसे न झाल्याने सांस्कृतिक वर्तुळातून तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.

**साहित्यिकांची मुख्यमंत्र्यांकडे धाव**

या प्रकारावर ज्येष्ठ साहित्यिक श्रीपाद भालचंद्र जोशी यांच्यासह शिक्षण क्षेत्रातील अभ्यासकांनी कडक शब्दांत आक्षेप नोंदवला आहे. श्रीपाद जोशी यांनी थेट मुख्यमंत्र्यांना पत्र लिहून या प्रकरणात लक्ष घालण्याची मागणी केली आहे. विद्यार्थ्यांना प्राथमिक स्तरावर आपल्या राज्याच्या लोकसंस्कृतीची व्यापक ओळख होणे गरजेचे आहे. त्यामुळे शिक्षण विभागाने एक 'रिझॉइंडर' (पुरवणी) जोडून पाठ्यपुस्तकात तत्काळ सुधारणा करावी, अशी मागणी या पत्रात करण्यात आली आहे.

**बालभारती आणि एससीईआरटीची चुप्पी**

या वादग्रस्त धड्याबाबत राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद आणि बालभारती यांच्याकडून अद्याप कोणताही अधिकृत खुलासा करण्यात आलेला नाही, यावरही आक्षेप घेण्यात आला आहे.

## संपादकीय ......

# इथेनॉल मिश्रणाचा पेच

*भारताने पेट्रोलमध्ये २० टक्के इथेनॉल मिश्रणाचे लक्ष्य पाच वर्षे आधीच गाठले. भारताची इथेनॉल उत्पादन क्षमता गरजेपेक्षा दुप्पट झाली असली, तरी जुन्या वाहनांचे मायलेज आणि इंजिनच्या सुरक्षेचा प्रश्न आहे.*

*भारतासाठी इंधन सुरक्षा हा आर्थिक आणि भूराजकीय दृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा विषय आहे. कच्च्या तेलाच्या आयातीवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी आणि देशांतर्गत उत्पादित इंधनाचा वापर वाढवण्यासाठी भारत गेल्या अनेक वर्षांपासून पेट्रोलमध्ये इथेनॉल मिश्रणावर भर देत आहे. इथेनॉल हे ऊस, मका किंवा इतर पिकांपासून तयार होणारे अल्कोहोल आधारित इंधन आहे, जे पेट्रोलमध्ये मिसळून वाहनांसाठी वापरले जाऊ शकते. २०३० पर्यंत ई-२० म्हणजे पेट्रोलमध्ये २० टक्के इथेनॉल मिश्रण साध्य करण्याची योजना होती. भारताने हे उद्दिष्ट तब्बल पाच वर्षे आधीच गाठले असून ई-२० आज राष्ट्रीय मानक बनले आहे. ई-२५, ई-८५ आणि ई-१०० हे पुढील टप्पे गाठण्याच्या महत्त्वाकांक्षेमुळे ग्राहक, वाहन उत्पादक आणि धोरणकर्त्यांसमोर नवीन प्रश्न उभे राहिले आहेत.*

*ई-२० नियमांचे उद्दिष्ट गाठण्यासाठी भारताला वर्षाला सुमारे १० ते ११ अब्ज लिटर इथेनॉलची गरज आहे; मात्र नोव्हेंबर २०२५ मध्येच देशाची उत्पादन क्षमता २० अब्ज लिटरवर पोहोचली. २०२६-२७ या आर्थिक वर्षात त्यात आणखी १५ टक्के वाढ अपेक्षित आहे. सध्याच्या गरजेपेक्षा ही क्षमता दुप्पट असल्याने अनेक कारखाने अवघ्या २५-३० टक्के क्षमतेवर चालत आहेत. त्यामुळे प्रश्न पुरवठा वाढवण्याचा नसून अतिरिक्त क्षमतेसाठी मागणी सुनिश्चित करण्याचा आहे. सरकारी कर्ज सवलतींमुळे खासगी क्षेत्राकडून या उद्योगात ४०,००० कोटींपेक्षा जास्त गुंतवणूक झाली; मात्र प्रकल्प बंद राहिल्यास खर्च वाढून ही गुंतवणूक धोक्यात येऊ शकते. साखरेच्या अस्थिर बाजारापेक्षा इथेनॉलला हमीभाव मिळत असल्याने कंपन्यांनी इथे गुंतवणूक वाढवली आहे. परिणामी, इथेनॉलचा गरजेपेक्षा जास्त पुरवठा होत आहे. त्यामुळे इथेनॉल मिश्रण या अतिरिक्त उत्पादनाला सामावून घेण्याचा एक मार्ग बनले आहे.*

*इथेनॉलचे उत्पादन वाढवण्यासाठी ऊस, मका आणि तांदळाचे अधिक उत्पादन लागेल. यासाठी युरिया, डायअमोनियम फॉस्फेट आणि पोटॅशसारख्या खतांची मागणी वाढेल. ही खते स्वतः आयात केलेल्या नैसर्गिक वायूवर अवलंबून असतात. या पिकांना जास्त पाठबळ दिल्यास शेतकरी तेलबिया आणि डाळींचे क्षेत्र कमी करण्यास प्रवृत्त होऊ शकतात. इथेनॉलच्या मोहापायी डाळी, तेलबिया आणि पशुखाद्याचा तुटवडा निर्माण होऊन 'अन्न की इंधन' असा पेच उभा ठाकू शकतो. इथेनॉलमुळे देशाचे एकूण आयात-अवलंबित्व कमी होणार नाही. ते केवळ खते, नैसर्गिक वायू आणि खाद्यतेलांकडे वळेल. पर्यावरणीय गणित हा आणखी एक गंभीर पेच आहे. एक लिटर इथेनॉलनिर्मितीसाठी उसाला २८६० लिटर, मक्याला ४०९३ लिटर, तर तांदळाला तब्बल १० हजार ७९० लिटर पाणी लागते. सध्या जवळपास ५०० कारखाने सुरू असून धान्यापासून तयार होणाऱ्या इथेनॉलचा वाटा वाढतो आहे, ज्यामुळे पाण्याची गरजही वाढते आहे. मक्याचा उत्पादन खर्च वाढतो आहे; पण खरेदी दर स्थिर असल्याने उत्पादकांना नुकसान होत आहे. अपुरी वितरण यंत्रणा, जनजागृतीचा अभाव आणि फ्लेक्स इंधन म्हणजे विविध प्रमाणातील पेट्रोल-इथेनॉल मिश्रणांवर चालू शकणाऱ्या वाहनांची महागडी किंमत यांमुळे अतिरिक्त अडथळे निर्माण होतील. सरकारने २२ ते ३० टक्के इथेनॉलमिश्रित पेट्रोलला केंद्रीय अबकारी करातून सवलत देत ते ई-२० च्या पातळीवर आणले, तसेच मोटार वाहन नियमांखाली ई-८५ आणि ई-१०० ला अधिकृत मान्यता देण्यासाठी हालचाली सुरू केल्या. 'ब्युरो ऑफ इंडियन स्टँडर्स'ने उच्च मिश्रणांचे तांत्रिक निकष जाहीर केले. सरकार ई-२२ ते ई-३० साठी मानके तयार करत आहे. ई-२५ वाहनांच्या चाचण्याही सुरू झाल्या. केंद्र सरकारने ई-१०० लाही कायदेशीर मान्यता दिली. ई-२० नंतरच्या कोणत्याही उच्च मिश्रणाची अंमलबजावणी पूर्ण चाचण्यांनंतरच केली जाईल. वाहन उत्पादक व इंधन पुरवठादारांना पुरेसा वेळ मिळणे अपेक्षित आहे.*

# जिल्हा परिषदेत १४ प्रयोगशील शेतकऱ्यांचा गौरव

## कृषी दिन उत्साहात साजरा, सीईओ सत्यम गांधी यांची उपस्थिती



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती**

महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री, हरित क्रांतीचे प्रणेते तथा कृषी क्षेत्राला नवे दिशादर्शन देणारे कै. वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त जिल्हा परिषदेच्या कृषी विभागाच्या वतीने कृषी दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी अमरावती जिल्ह्यातील १४ तालुक्यांमधील प्रत्येकी एका प्रयोगशील व प्रगतशील शेतकऱ्याचा मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यम गांधी तसेच उपस्थित मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. डॉ. पंजाबराव देशमुख सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यम गांधी होते. यावेळी अमरावतीचे विभागीय कृषी सहसंचालक गणेश घोरपडे, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक ठमके, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी अर्चना निस्ताने, उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्रीराम कुलकर्णी, कृषी विकास अधिकारी मल्ला तोडकर, विभागीय अधीक्षक कृषी अधिकारी प्रशांत नाईक, उपविभागीय कृषी अधिकारी पंकज चेडे, तालुका कृषी अधिकारी प्रशांत गुल्हाने, उत्कर्ष भोसले, गटविकास अधिकारी सुदर्शन तुपे, तृप्ती दृपकर, प्रा. जितेंद्र दुर्गे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. कृषी दिनानिमित्त अमरावती जिल्ह्यातील १४ प्रयोगशील शेतकऱ्यांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते शाल, श्रीफळ, रोपटे व सन्मानचिन्ह देऊन विशेष सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक जिल्हा कृषी विकास अधिकारी मल्ला तोडकर यांनी, तर संचालन कृषी अधिकारी पवनकुमार ढोमणे यांनी केले. आभार जिल्हा कृषी अधिकारी नीलेश राठोड यांनी मानले.

### या प्रयोगशील शेतकऱ्यांचा झाला सन्मान


पुष्पक खापरे (चांदूरबजार), रिंगा जांभेकर (चिखलदरा), ममता ठाकूर (चांदूररेल्वे), बाळकृष्ण सहारे (अंजनगावसुर्जी), राहुल बांबल (धामणगावरेल्वे), मनोज इंगोले (अमरावती), सूरज गिरी (तिवसा), शरद बोंडे (अचलपूर), विकास सावरकर (भातकुली), राजेश खेडकर (नांदगाव खंडेश्वर), विजय लासूरकर (दर्यापूर), सुखराम धुर्वे (धारणी), ललितकुमार ढेवले (मोर्शी) आणि आशिष गुडधे (वरुड) यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

# 'अर्बन' एकांकिका राज्यस्तरीय स्पर्धेत प्रथम



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती-** महाराष्ट्र राज्य मराठी एकांकिका स्पर्धेच्या प्राथमिक फेरीत स्थानिक विदर्भ युथ वेलफेअर सोसायटीद्वारा संचालित प्रो. राम मेघे इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी ॲण्ड रिसर्च यांच्या 'अर्बन' या एकांकिकेने प्रथम क्रमांक पटकाविला. ६४ व्या महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्यस्पर्धा, राज्य मराठी एकांकिका स्पर्धा तसेच २२ व्या महाराष्ट्र राज्य बालनाट्य स्पर्धेच्या प्राथमिक फेरीतील विजेत्या कलावंत, तंत्रज्ञ व संस्थांचा विभागीय पारितोषिक वितरण समारंभ नागपूरच्या वसंतराव नाईक स्मृती सभागृहात पार पडला. 'अर्बन' एकांकिकेच्या उत्कृष्ट सादरीकरणासोबतच तांत्रिक विभागांमध्येही विद्यार्थ्यांनी यश संपादन केले. त्यामध्ये आकांक्षा धंदर यांना प्रथम दिग्दर्शन, रेवणनाथ पागरुत यांना प्रकाशयोजनेत प्रथम, प्रणव गुजर यांना नैपथ्यात प्रथम, कार्तिक उमाळे यांना वेशभूषामध्ये प्रथम, तर अभंग व्यवहारे यांना द्वितीय संगीत दिग्दर्शन पुरस्काराने गौरविण्यात आले. 'अर्बन' या एकांकिकेसाठी कार्यरत विद्यार्थी संघामध्ये आकांक्षा धंदर (विद्यार्थी दिग्दर्शक), वेदश्री मोरखडे, ऋतुजा पांडे, मृण्मयी पोतदार, श्रावणी गव्हाणकर, अभंग व्यवहारे, रेवणनाथ पागरुत, प्रणव गुजर, कार्तिक उमाळे आणि तुषार तरोणे यांचा समावेश होता. या संघाचे व्यवस्थापक म्हणून प्रा. अर्पित चौधरी यांनी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट सांघिक सादरीकरण करून स्पर्धेत अव्वल स्थान मिळविले. या यशामुळे आगामी राज्यस्तरीय स्पर्धांमध्येही संघाकडून उत्कृष्ट कामगिरीची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल प्राचार्य डॉ. जी. आर. बमनोटे तसेच विदर्भ यूथ वेलफेअर सोसायटीचे अध्यक्ष डॉ. नितीन धांडे यांच्यासह उपाध्यक्ष ॲड. उदय देशमुख, डॉ. हेमंत देशमुख, युवराजसिंग चौधरी, नितीन हिवसे, डॉ. पूनम चौधरी, पंकज देशमुख, प्रा. विनय गोहाड व गजानन काळे आदींनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.-

# ब्राह्मणवाडा थडीत नाल्यांची दुरवस्था



### गुरुकुल चौक ते जनता चौक परिसरात घाणीचे साम्राज्य

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२ब्राह्मणवाडा थडी**

ग्रामपंचायत हद्दीतील वॉर्ड क्रमांक ६ मधील गुरुकुल चौक ते जनता चौक या मार्गावरील नाल्यांची पावसाळ्यापूर्वी साफसफाई न झाल्याने नाले कचरा, गाळ व झाडाझुडपांनी तुंबले आहेत. परिणामी परिसरात घाण, दुर्गंधी आणि साचलेल्या पाण्यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे.नाल्यांमध्ये प्लास्टिक कचरा आणि गाळ मोठ्या प्रमाणात साचल्याने अनेक ठिकाणी पाणी तुंबून राहत आहे. त्यामुळे डासांचे प्रमाण वाढून डेंग्यू, मलेरिया यांसारख्या साथीच्या आजारांचा धोका निर्माण झाला आहे. याबाबत नागरिकांनी ग्रामपंचायतीकडे वारंवार लेखी व तोंडी निवेदने देऊन नाल्यांची तातडीने साफसफाई करण्याची मागणी केली. मात्र, ग्रामपंचायत प्रशासनाने याकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.वॉर्ड क्रमांक ६ मधील मूलभूत सुविधांकडे सातत्याने दुर्लक्ष होत असल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण आहे. पावसाळ्यात नाले तुंबल्यामुळे पावसाचे पाणी रस्त्यावर येऊन परिस्थिती अधिक गंभीर होण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. नागरिकांनी ग्रामपंचायतीने तातडीने नाल्यांची साफसफाई करून आरोग्याच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी केली आहे.

# ढोल, ताशे वाजवून प्रशासनाचा निषेध



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२ यवतमाळ-** राजर्षी शाहू महाराज कलावंत साहित्यिक मानधन सन्मान योजनेतील लाभार्थ्यांची निवड यादी तयार करण्यात आली नाही. या प्रकारामुळे संतप्त कलावंतांनी जिल्हा परिषदेसमोर ढोल, ताशे वाजवून प्रशासनाचा निषेध नोंदविला. दरम्यान, मुख्य कार्यकारी अधिकार्!यांना मागण्यांचे निवेदन देण्यात आले आहे. जिल्हा परिषद पंचायत विभागाच्या माध्यमातून राजर्षी शाहू महाराज कलावंत साहित्यिक मानधन योजना कार्यान्वित आहे. या योजनेत ज्येष्ठ कलावंत साहित्यिकांना मानधन देण्यात येते. तर चार महिन्यापूर्वीच अर्ज दाखल केलेल्या कलावंतांच्या मुलाखतीसुद्धा प्रशासनाने घेतल्या आहेत.

तरीसुद्धा लाभार्थी निवड करण्यात आली नाही. विशेष म्हणजे लाभार्थी निवड गेल्या चार वर्षांपासून प्रलंबित आहेत. मध्यंतरी शासकीय मानधन निवड समितीच्या अशासकीय सदस्यांच्या आर्थिक गैरव्यवहाराची ऑडिओ क्लिप व्हायरल झाली होती.

या क्लिपची सत्यता तपासून पाहण्यासाठी पोलिस प्रशासनाला आदेश द्यावे, अशी मागणी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज कलावंत वारकरी सेवा विकास आणि सन्मान संस्थेच्या पदाधिकार्!यांनी केली. या प्रकरणाची चौकशी करून दोषीला समितीतून बरखास्त करावे, अशी मागणी केली. अशासकीय सदस्यांचे गुणांकन शून्य करावे, अशीही मागणी निवेदनातून करण्यात आली होती. प्रशासनाने दुर्लक्ष केल्यामुळे बुधवारी कलावंतांनी जिल्हा परिषदेसमोर ढोल, ताशे वाजवून प्रशासनाचा निषेध नोंदविला.

तसेच एकदिवसीय लाक्षणिक धरणे आंदोलनसुद्धा करण्यात आले. यावेळी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज कलावंत वारकरी सेवा विकास आणि सन्मान संस्थेचे अध्यक्ष ॲड. श्याम खंडारे, सिद्धार्थ भवरे, गंगाधर घोटेकर, राजेश मडावी, गणेश धर्माळे, रमेश वाघमारे, मुरलीधर धनरे, ज्ञानेश्वर महाराज रोकडे, वंदना कुटे आदी उपस्थित होते.

### 'त्या' तालुक्यात फेर सादरीकरण करावे

जिल्ह्यातील एका अशासकीय सदस्याने पैसे मागितल्याची एक 'ऑडिओ क्लिप' व्हायरल झाली होती. तो प्रकार अतिशय निंदनीय असून, वादग्रस्त अशासकीय सदस्यांचे गुणांकन शून्य करावे आणि त्या तालुक्यातील कलावंतांचे फेर सादरीकरण करून गुणांकन द्यावे, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

# झेडपी, पंचायत समिती सदस्यांना कर्जमाफीत ठेंगा

## शेतकऱ्यांना दोन लाखांपर्यंत कर्जमाफीचा मिळणार लाभ





**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती**

शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी राज्य शासनाने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना लागू केली आहे. दोन लाख रुपयांपर्यंतची कर्जमुक्ती देण्यात येत आहे, यासाठी नियमही जाहीर केले आहेत. मात्र यामध्ये जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपरिषद सदस्य, नगरपंचायत, महापालिकासह माजी मंत्री, आमदार-खासदार आदींना कर्जमाफीचा लाभ मिळणार नसल्याचे स्पष्ट केले आहे. २०१७ मध्ये दीड लाख रुपयांपर्यंत, तर २०१९ मध्ये दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी दिली होती. यावेळीही दोन लाख रुपयांपर्यंतची कर्जमुक्ती देण्यात येत आहे. अल्पमुदतीची थकीत पीककर्जे तसेच पुनर्गठित आणि फेरपुनर्गठित कर्जाचा, या योजनेत समावेश केला आहे. यावेळी एक महत्त्वाचा बदल केला आहे आणि तो म्हणजे पूर्वी दोन लाख रुपयांच्या मर्यादेपेक्षा थोडी जास्त रक्कम कर्ज असलेल्या शेतकऱ्यांना लाभ मिळत नव्हता, म्हणजे एखाद्या शेतकऱ्याचे दोन लाख दहा हजार कर्ज असेल तर तो शेतकरी अपात्र होता. आता मात्र अशा शेतकऱ्यांनी स्वतःचा हिस्सा भरल्यानंतर दोन लाख रुपयांपर्यंतची रक्कम शासन भरणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना पुन्हा कर्ज मिळण्याचा मार्ग सुकर होणार आहे.

तसेच यामध्ये जमीन धारणेची अट नाही. याशिवाय नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहन लाभ देण्याची तरतूद कली आहे. प्रामाणिक कर्जदारांना प्रोत्साहन देण्यासाठी हा निर्णय घेतला आहे.

### २४ वर्षांची लष्करी सेवा पूर्ण करून

# मेजर तत्त्वशील चोरपगार यांचे दर्यापुरात जल्लोषात स्वागत



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२ दर्यापूर** शिवर येथील मेजर तत्त्वशील रामराव चोरपगार यांनी भारतीय लष्करातील २४ वर्षांची गौरवशाली सेवा पूर्ण करून दर्यापुरात आगमन केले. यावेळी दर्यापूर बसस्थानक परिसरात त्यांचे भूतपूर्व सैनिक संघटना, चोरपगार परिवार, मित्रपरिवार व नागरिकांच्या उपस्थितीत भव्य स्वागत करण्यात आले.डीजेच्या गजरात आणि घोषणांच्या वातावरणात मेजर चोरपगार यांची भव्य शोभायात्रा दर्यापूर बसस्थानकातून अकोट रोडमार्गे शिवर गावापर्यंत काढण्यात आली. शेकडो नागरिकांनी या मिरवणुकीत सहभाग घेत त्यांच्यावर पुष्पवृष्टी करून देशसेवेबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

शिवर येथे शोभायात्रेचा समारोप झाल्यानंतर कृषी उत्पन्न बाजार समिती परिसरातील कृषी भवन येथे भोजनदानाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी मेजर तत्त्वशील चोरपगार यांनी २४ वर्षांच्या लष्करी सेवेत आलेले विविध अनुभव, देशसेवेतील सुख-दुःखाचे क्षण आणि तरुणांनी सैन्यात भरती होऊन राष्ट्रसेवा करण्याचे महत्त्व याविषयी मार्गदर्शन केले.दरम्यान, रोहिणी फाउंडेशन, दर्यापूरच्या वतीनेही बसस्थानक चौकात मेजर चोरपगार यांचा सत्कार करण्यात आला. त्यांच्या स्वागतासाठी नागरिकांची मोठी गर्दी झाल्याने संपूर्ण परिसर देशभक्तीच्या उत्साहाने भारावून गेला होता.-

# मुख्य पाइपलाइन फुटली; सहा दिवसांपासून पाणीपुरवठा ठप्प, नागरिकांत संताप

विदर्भ प्रजासत्ताक
**दि.२वर्धा-** शहरा लगतच्या गावांसाठी वरदान ठरलेली पिपरीसह १४ गावांची प्रादेशिक पाणीपुरवठा योजना गेल्या पाच दिवसांपासून कोलमडली आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण आणि जल जीवन मिशन अंतर्गत चालणाऱ्या या योजनेची मुख्य पाइपलाइन येळाकेळी जवळ खोदकामादरम्यान फुटल्याने अनेक भागांतील पाणीपुरवठा पूर्णपणे ठप्प झाला आहे.

गेल्या सहा दिवसांपासून पाण्याचा थेंबही न मिळाल्याने ग्रामीण भागात तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली असून नागरिकांमधून प्रशासनाविरोधात प्रचंड संताप व्यक्त होत आहे. धाम प्रकल्पातून या योजनेअंतर्गत वर्धा शहरालगतच्या पिपरी (मेघे), कारला, सावंगी (मेघे), सिंदी (मेघे), बोरगाव (मेघे), उमरी मेघे, साटोडा, आलोडी, दत्तपूर, वरुड, वायगाव निपाणी, नालवाडी, म्हसाळा आणि सालोड (हिरापूर) प्रमुख गावांना पाणीपुरवठा केला जातो. गेल्या गुरुवारपासून नळांना पाणी न आल्यामुळे नागरिकांचे हाल होत आहेत. ज्यांच्याकडे स्वतःची बोअरवेल किंवा विहीर आहे, त्यांना तात्पुरता दिलासा मिळाला आहे. मात्र, बहुतांश सर्वसामान्य नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी उन्हात हातपंप, दूरवरील विहिरी आणि शेजारील भागांवर अवलंबून राहावे लागत आहे. घरगुती कामांसाठी पाणी कोठून आणावे, या विवंचनेत नागरिक अडकले आहेत.

**'तात्पुरत्या' दुरुस्तीमुळे नागरिक त्रस्त-** मुख्य पाइपलाइनमध्ये लिकेज होणे किंवा तांत्रिक बिघाड होणे ही आता नित्याचीच बाब झाली आहे. अधिकारी दरवेळी तात्पुरती दुरुस्ती करून वेळ मारून नेतात, परंतु या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढला जात नाही. पाइपलाइन दुरुस्तीचे कोणतेही पूर्वनियोजन नसणे, पाणी बंद राहणार असल्यास नागरिकांना आधी कल्पना न देणे आणि ऐनवेळी टँकरद्वारे पर्यायी पाणीपुरवठा न करणे, यामुळे प्रशासकीय नियोजनाचे वाभाडे निघाले आहेत. वारंवार तक्रारी करूनही संबंधित अधिकारी या गंभीर समस्येकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप स्थानिक ग्रामस्थांनी केला आहे.

**पाणीपुरवठा सुरळीत करा**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने मुख्य पाइपलाइनची तातडीने आणि कायमस्वरूपी दुरुस्ती करून नियमित व सुरळीत पाणीपुरवठा सुरू करावा, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. भविष्यात अशा प्रकारच्या वारंवार होणाऱ्या अडचणी टाळण्यासाठी दीर्घकालीन उपाययोजना राबविण्याची अपेक्षाही व्यक्त केली जात आहे.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

# चिखलदरा मार्गावर आता शनिवार व रविवारी वनवे

## जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश, पर्यटकांची गर्दी वाढणार




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१ अमरावती,**

चिखलदरा हे पर्यटनस्थळ असून आजूबाजूचे जिल्ह्यातील पर्यटक सुट्टीच्या दिवशी, शनिवार व रविवारला भरपूर प्रमाणात चिखलदरा येथे येतात. चिखलदरा मार्ग हा अरुंद व घाट वळणाचा असल्याने अपघात होण्याची शक्यता असते. त्यामुळे परतवाडा-चिखलदार मार्गावरील वाहतूक एक-मार्गी पद्धतीने वळविण्याचे आदेश जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी जारी केले आहे.


याकारणास्तव २७ सप्टेंबर २०२६ पर्यंत महिन्यातील प्रत्येक शनिवार व रविवारी त्याचप्रमाणे शासकीय, सार्वजनिक सुट्टीचे लगत पूर्व दिवशी दुपारी २ वाजता ते शासकीय, सार्वजनिक सुट्टीचे लगत नंतरचे दिवशी दुपारी २ वाजेपर्यंत परतवाडा वरून चिखलदरा जाणारी वाहतुक ही परतवाडा वरून धामणगांव गढी मार्गे चिखलदरा एकतर्फी जाईल तसेच चिखलदरा वरून परतवाडा परत येणारी वाहतुक ही चिखलदरा वरून घटांग मार्गे परतवाडा एकतर्फी येईल. या मार्गावरील गावातील स्थानिक नागरिकांना रस्ते वाहतुक वळविण्याच्या आदेशात सुट देण्यात येत आहे, याची नोंद नागरिकांनी घ्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी केले आहे.

# जिल्ह्यात आरटीई प्रवेशाच्या ६४६ जागा रिक्तच

## प्रतिक्षा यादीची तिसरी फेरी सुरू, प्रवेशाकरिता उद्याची डेडलाईनआतापर्यंत १९८२ जागांवर प्रवेश निश्चित

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती-**

१ जूलैपासून शाळा सुरू झाल्या आहेत. तरीही आरटीई प्रवेशाच्या तब्बल ६४६ जागा रिक्त आहेत. प्रवेश प्रक्रिया सुरू झाल्यापासून आतापर्यंत जिल्ह्यात १९८२ जागांवर प्रवेश निश्चित करण्यात आले आहेत. त्यामुळे आता रिक्त जागांसाठी पुन्हा प्रतिक्षा यादीतील तिसरी फेरी राबविली जात असून याकरिता ३ जूलैची डेडलाईन देण्यात आली आहे. सामाजिक दृष्ट्या मागासवर्गीय आणि आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी खाजगी शाळांमध्ये २५ टक्के जागा राखीव ठेवल्या जातात. यंदा या प्रक्रियेला पालकांनी संमिश्र प्रतिसाद दिला आहे.




जिल्ह्यातील २२७शाळांमध्ये २ हजार ६२६ जागाराखीव होत्या. या जागांसाठी तब्बल ७ हजार ९५३ पालकांनी ऑनलाइन अर्ज दाखल केले होते. १० एप्रिल रोजी पहिली मुख्य सोडत (लॉटरी) जाहीर झाली. यात २ हजार ५८६ विद्यार्थ्यांची निवड झाली. मात्र त्यापैकी केवळ १ हजार ९८२ विद्यार्थ्यांनीच प्रत्यक्ष शाळेत जाऊन प्रवेश निश्चित्त केला. २५ जून रोजी दुसरी फेरी संपली. तर तिसऱ्या फेरीला ३ जुलैची डेडलाईन देण्यात आली आहे. अद्यापही जिल्ह्यात ६४६ जागा रिक्त असल्याने या जागांवर प्रवेशाकरिता आता चौथी फेरी घ्यावी लागणार आहे.

### या अडचणींमध्ये प्रवेश रखडले

अनेक विद्यार्थ्यांना त्यांच्या घरापासून खूप लांब असलेल्या किवा अनपेक्षित शाळांमध्ये प्रवेश मिळाल्यात. पालकांना पाल्यासाठी ज्या नामांकित शाळां हव्या होत्या, त्या न मिळाल्याने त्यांनी प्रवेशाकडे पाठ फिरवली. तसेच गैरसोयीच्या ठिकाणी असलेल्या शाळांमध्ये प्रवेश मिळाल्याने पालकांनीपप्रवेशच केले नाही तरबांच पालकांनी कागदपत्रांची पुर्तता केली नाही. त्यामुळे अद्यापही ६४६ जागा प्रवेशाकरिता रिक्त आहेत.-

# जिल्ह्यात दोन दिवस धुव्वाधार पावसाचा मोठा फटका

## तिघांचा मृत्यू, ४१ पशुधन दगावले, ७० घरांची पडझड, चांदूर बाजार तालुक्यात मोठे नुकसान

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२अमरावती-** जिल्ह्यात २९ व ३० जून रोजी झालेल्या पावसामुळे चांदूरबाजार तालुक्यात मोठे नुकसान झाले असून पुराच्या पाण्यात वाहून गेल्याने दोन जणांचा मृत्यू झाला. तर तिवसा तालुक्यात पिंगळाई नदीत पडून एकाचा मृत्यू झाला. जिल्हा प्रशासनाने सादर केलेल्या प्राथमिक अहवालानुसार या दोन दिवसांत जिल्ह्याचे सरासरी पर्जन्यमान १८.८ मिमी इतके नोंदविण्यात आले असून दोन महसूलमंडळात अतिवृष्टीचा सामना करावा लागला.

चांदूरबाजार तालुक्यातील पांढरी येथील रविंद्र रामभाऊ आवारे (५३) आणि गोपाळ वासुदेवराव निर्वार (४०) यांचा पुराच्या पाण्यात वाहून जाऊन मृत्यू झाला. याशिवाय तालुक्यातील एका गावात पशुधनाचेही मोठे नुकसान झाले. कोंबड्या, असे एकूण ४१ पशुधन पुराच्या पाण्यात वाहून गेल्याने १ गाय, २० बकऱ्या आणि २० मृत्युमुखी पडले. घरांच्यानुकसानीत तीन गावांतील ७० घरांचे नुकसान झाले असून त्यापैकी ६५ घरांचे अंशतः नुकसान, तर ५ गोठ्यांचे नुकसान झाले आहे.



तसेच तिवसा तालुक्यातील सुरवाडी खुर्द येथील सतीश रंगरावजी गायकवाड (४३) या शेतकऱ्याचा पिंगळाई नदीमध्ये बुडून मृत्यू झाला. शेतीपिकांच्या नुकसानीचा प्राथमिक अंदाज घेण्याचे काम सुरू असून लाखणवाडी परिसरासह चांदूरबाजार तालुक्यातील विविध भागांतील पिकांचे पंचनामे सुरू आहेत. महसूल व कृषी विभागाच्या पथकांकडून नुकसानग्रस्त भागांचे सर्वेक्षण करण्यात येत असून अतिम अहवालानंतर नुकसानभरपाईची प्रक्रिया सुरू होणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# ६ जुलैला घडणार अनोखी खगोलीय घटना

## सूर्यप्रकाश पृथ्वीवर पोहोचण्यास लागतील १७ सेकंद अधिक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती-** पृथ्वी सूर्याभोवती लंबवर्तुळाकार कक्षेत फिरत असल्याने वर्षभरात दोघांमधील अंतर सतत बदलत असते. या खगोलीय प्रवासात सोमवार ६ जुलै रोजी पृथ्वी सूर्यापासून वर्षातील सर्वाधिक अंतरावर पोहोचणार असून या स्थितीला 'अपसूर्य' असे म्हटले जाते.

दिवशी सूर्योदयाच्या वेळी पृथ्वी आणि सूर्य यांच्यातील अंतर सुमारे १५ कोटी २० लाख ८७ हजार ७०६ किलोमीटर इतके असेल. याउलट, दरवर्षी ३ जानेवारीच्या सुमारास पृथ्वी सूर्याच्या सर्वाधिक जवळ असते. त्या स्थितीला 'उपसूर्य' म्हणतात. त्या वेळी हे अंतर सुमारे १४ कोटी ७० लाख किलोमीटर असते.

अपसूर्य स्थितीत सूर्यप्रकाशाला पृथ्वीपर्यंत पोहोचण्यासाठी नेहमीपेक्षा सुमारे १७ सेकंद अधिक वेळ लागतो. तसेच सूर्याचा दिसणारा आकार किंचित लहान भासतो. मात्र, याचा पृथ्वीवरील तापमानावर किंवा ऋतूंवर कोणताही थेट परिणाम होत नाही. ऋतूंचे कारण पृथ्वीचा अक्ष सुमारे २३.५ अंशांनी झुकलेला असणे हे आहे. या दिवशी दिवसाचा कालमानही मोठा असेल. यासह सायंकाळपासून पहाटेपर्यंत आकाशात पाच ग्रहांचेही दर्शन होईल, अशी माहिती दोड यांनी दिली.



**सूर्य निरीक्षण करताना घ्या काळजी**

सूर्योदय किंवा सूर्यास्ताच्या वेळीच काही क्षण सूर्याचे निरीक्षण करावे. सूर्य वर आल्यानंतर त्याच्या प्रखर तेजाकडे थेट पाहणे टाळावे. पावसाळ्यात विरळ ढगांआडून सूर्याचे क्षणिक दर्शन घेता येऊ शकते; मात्र टक लावून पाहणे धोकादायक ठरू शकते.

विश्वभारती केंद्राने नागरिकांना आवश्यक ती काळजी घेत वर्षातून एकदाच येणाऱ्या या खगोलीय घटनेचा आनंद घेण्याचे आणि आकाश निरीक्षणाची आवड जोपासण्याचे आवाहन केले आहे.

**अपसूर्य म्हणजे काय?**

पृथ्वी सूर्यापासून वर्षातील सर्वाधिक दूर असण्याची स्थिती. यंदा ही घटना ६ जुलै रोजी.

पृथ्वी-सूर्य अंतर : १५.२० कोटी किलोमीटरपेक्षा अधिक.

**उपसूर्य व अपसूर्य**

उपसूर्य : सुमारे ३ जानेवारी, अंतर सुमारे १४.७० कोटी किमी.

अपसूर्य : सुमारे ६ जुलै, अंतर १५.२० कोटी किमी.पेक्षा अधिक

सूर्यप्रकाश पृथ्वीवर पोहोचण्यास अपसूर्य स्थितीत सुमारे १७ सेकंद अधिक वेळ लागतो.

# अमरावतीतील अतिगर्दीच्या इमारतींचे १५ दिवसांत अग्निसुरक्षा सर्वेक्षण

## त्रुटींवर कठोर कारवाईचे संकेत

**विदर्भ प्रजासत्ताकदि.२अमरावती** :शहरातील अतिगर्दीच्या सार्वजनिक व व्यावसायिक इमारतींमधील अग्निसुरक्षा व्यवस्थेचा सर्वंकष आढावा घेण्यासाठी अमरावती महानगरपालिकेत महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. महापौर श्रीचंद तेजवानी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत नागरिकांच्या जीवित सुरक्षेशी कोणतीही तडजोड केली जाणार नसल्याचे स्पष्ट करण्यात आले. तसेच शहरातील सर्व गर्दीच्या इमारतींचे सर्वेक्षण करून १५ दिवसांत सविस्तर अहवाल सादर करण्याचे निर्देश संबंधित विभागांना देण्यात आले.बैठकीत खाजगी कोचिंग क्लासेस, शाळा, महाविद्यालये, रुग्णालये, मॉल, हॉटेल, मंगल कार्यालये, बाजारपेठा तसेच इतर सार्वजनिक व व्यावसायिक इमारतींमध्ये अग्निसुरक्षा नियमांचे पालन होत आहे का, याचा आढावा घेण्यात आला. अग्निशमन यंत्रणा कार्यरत आहे का, आपत्कालीन बाहेर पडण्याचे मार्ग उपलब्ध आहेत का, अग्निशमन विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र (एनओसी) घेतले आहे का आणि उपकरणांची नियमित तपासणी केली जाते



का, याची माहिती संकलित करण्याच्या सूचना देण्यात आल्या.महानगरपालिका आयुक्त वर्षा लड्डा यांनी सर्व विभागांनी समन्वयाने काम करून शहरातील अतिगर्दीच्या इमारतींची अद्ययावत नोंदणी करावी व प्रत्येक इमारतीच्या अग्निसुरक्षा स्थितीचा सविस्तर अहवाल १५ दिवसांत सादर करावा, असे निर्देश दिले. याशिवाय शहरासाठी अग्निसुरक्षेची प्रमाणित कार्यपद्धती (एसओपी) तयार करण्यात येणार असून त्यामध्ये किमान सुरक्षा मानके, नियमित तपासणी, मॉक ड्रिल, आपत्कालीन स्थलांतर व जबाबदार अधिकाऱ्यांची कर्तव्ये निश्चित केली जाणार आहेत.अग्निशमन विभाग, नगररचना विभाग व इतर संबंधित विभाग संयुक्तपणे सर्वेक्षण करतील. ज्या इमारतींमध्ये गंभीर त्रुटी आढळतील त्यांच्यावर नियमानुसार कारवाई केली जाणार आहे. इमारत मालकांनी अग्निशमन यंत्रणा सुस्थितीत ठेवणे, कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देणे आणि अग्निशमन विभागाच्या सूचनांचे पालन करणे आवश्यक असल्याचेही बैठकीत स्पष्ट करण्यात आले.-

# जिल्ह्यात दोन नव्या गटविकास अधिकाऱ्यांची नेमणूक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२यवतमाळ**

जिल्ह्यातील कळंब आणि घाटंजी पंचायत समितीत दोन गटविकास अधिकारी, तर दारव्हा पंचायत समितीत सहाय्यक गटविकास अधिकाऱ्यांची नेमणूक केली आहे. जिल्ह्यातील काही पंचायत समितीत नियमित गटविकास अधिकारी नव्हते. परिणामी, कारभार प्रभारींच्या खांद्यावर सोपविण्यात आला होता. रिक्त जागेवर कायमस्वरूपी गटविकास अधिकार्!यांची नेमणूक करावी, अशी मागणी सातत्याने केली जात होती. मात्र, शासन आणि प्रशासनाने पूर्णत: दुर्लक्ष केले होते. आता अधिवेशन काळात बदल्या होण्याचे कुठलेही संकेत नव्हते. परंतु नुकतीच शासनस्तरावरून गटविकास अधिकारी तसेच सहाय्यक गटविकास अधिकार्!यांच्या बदल्यांचे आदेश निघाले. यामध्ये यवतमाळ जिल्ह्यात दोन गटविकास अधिकारी, तर एक सहाय्यक गटविकास अधिकार्!यांची बदली करण्यात आली आहे. यात कळंब पंचायत समितीत अजय चव्हाण, घाटंजीत सिकंदर इनामदार, तर दारव्हा पं.स. सहाय्यक गटविकास अधिकारी म्हणून अनिल जाधव यांची नेमणूक करण्यात आली आहे. दारव्हा पंचायत समितीचा कारभार सहाय्यक गटविकास अधिकारी प्रभार दिल्या जाईल का, ह्याबाबत साशंकताच म्हणावी लागेल.

**बदली झाली, पण कार्यमुक्तीची प्रतीक्षा** – जिल्ह्यात उमरखेड आणि वणी या दोन ठिकाणी नियमित गटशिक्षणाधिकारी कार्यरत आहे. उर्वरित १४ तालुक्याचा कारभार प्रभारावरच आहेत. अशात वर्धा येथील धर्मपाल कुमरे यांची यवतमाळ पंचायत समितीत, तर वणीचे स्नेहदीप काटकर यांची चंद्रपूर बदली झाल्याचे आदेश मंगळवारी (ता. ३०) निर्गमित झाले आहे. परंतु या अधिकार्!यांची एसआयरकरिता मतदान नोंदणी तसेच सहाय्यक मतदान नोंदणी म्हणून नियुक्ती झाली आहे. त्यामुळे हा कार्यक्रम पूर्ण होईपर्यंत बदली झालेल्यांना कार्यमुक्त केले जाणार नाही. सध्यातरी कार्यमुक्तीची प्रतीक्षा अधिकार्!यांना करावी लागणार आहे.




# रासायनिक खतांना फाटा! अमरावतीच्या शेतकऱ्याचा 'पंचामृत' प्रयोग राष्ट्रीय पातळीवर गाजला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती**

रासायनिक खतांचा वाढता वापर, उत्पादन खर्चातील वाढ आणि वन्य प्राण्यांच्या उपद्रवांमुळं त्रस्त झालेल्या शेतकऱ्यांसाठी अमरावतीतील प्रयोगशील शेतकरी रवींद्र मेटकर यांनी विकसित केलेला पंचामृत प्रयोग नवा पर्याय म्हणून पुढं येत आहे. अंडी, ताक, गूळ ,चुना आणि तुरटी या सहज उपलब्ध घटकांपासून तयार होणाऱ्या या द्रवणामुळं पिकांची वाढ, उत्पादन क्षमता आणि रोगप्रतिकारक शक्ती वाढत असल्याचा दावा करण्यात येत आहे. विशेष म्हणजे या प्रयोगाची राष्ट्रीय पातळीवर दखल घेतली गेली असून कृषी क्षेत्रात त्याची चर्चा आहे.

संशोधनातून जन्माला आलेलं पंचामृत : भारतीय कृषी संशोधन परिषदेचा सन्मान प्राप्त आणि केंद्रीय कृषी मूल्य व किंमत आयोगाचे शेतकरी प्रतिनिधी असलेल्या रवींद्र मिटकरी यांनी आपल्या अंजनगाव बारी येथील शेतात अनेक वर्षांच्या अनुभवातून हा प्रयोग विकसित केलाय. पारंपारिक शेती पद्धतीनं आधुनिक दृष्टिकोनाची जोड देत त्यांनी तयार केलेलं पंचामृत हे पिकांसाठी पोषक द्रावण म्हणून वापरलं जात आहे.

या पंचामृतामध्ये अंडी, ताक, गुळ, चुना आणि तुरटी यांचा समावेश आहे. अंड्यांमधील अमिनो आम्ले व प्रथिनं पिकांच्या वाढीस चालना देतात. ताकातील सूक्ष्मजीव बुरशीजन्य रोगांवर नियंत्रण ठेवण्यास मदत करतात. तुरटी जंतुनाशक म्हणून काम करतं तर चुण्यामुळं पिकांना आवश्यक कॅल्शियम मिळतं. या प्रक्रियेत निर्माण होणाऱ्या सूक्ष्मजीवांना पोषण मिळावं म्हणून गुळाचा वापर केला जातो.

हे द्रावण तयार करण्यासाठी दीड लिटर ताकामध्ये १२ अंडी, प्रत्येकी १०० ग्रॅम गूळ, तुरटी आणि चुना मिसळला जातो. हे मिश्रण सुमारे १५ ते २० दिवस थांबवून ठेवलं जातं. विशेष म्हणजे एका एकरासाठी लागणाऱ्या पंचामृताचा खर्च अवघा १०० रुपये येतो. त्यामुळं उत्पादन खर्च कमी करण्यासाठी हा पर्याय शेतकऱ्यांना उपयुक्त ठरतं, असं रवींद्र मेटकर यांनी सांगितले.



सोयाबीन पिकावर चार वेळा पंचामृताची फवारणी केल्यानंतर उत्पादनात लक्षणीय वाढ झाली. तूर, कांदा आणि ज्वारी यांसारख्या पिकांमध्ये ही चांगले परिणाम दिसून आलेत. काही शेतकऱ्यांना ज्वारीत एकरी २५ क्विंटलपर्यंत उत्पादन मिळाला. पिकांची वाढ, दाण्यांचा भराव आणि गुणवत्तेमध्ये सुधारणा झाल्याचं निरीक्षण ही नोंदवण्यात आलं आहे, असं रवींद्र मेटकर म्हणाले.

पंचामृताचा आणखी एक वैशिष्ट्यपूर्ण फायदा म्हणजे त्याचा विशिष्ट गंध. या गंधामुळं रानडुक्कर, रोही, माकडं तसंच काही पक्षी पिकांच्या परिसरात येण्याचं प्रमाण कमी होतं. त्यामुळं पिकांचं नुकसान टाळण्यास मदत होत असून शेतकऱ्यांची मोठी चिंता दूर होते, असं देखील रवींद्र मेटकर यांनी सांगितलं.

पंचामृताच्या वापरामुळं रासायनिक फवारण्यांची गरज कमी होत असल्याचा दावा करण्यात येत आहे. त्यामुळं जमिनीतली सुपीकता टिकून राहण्यास मदत होते आणि मातीमध्ये रासायनिक घटकांचं प्रमाण कमी राहतं, असं रवींद्र मेटकर यांनी सांगितलं.

डिसेंबर २०२५ मध्ये किसान दिनानिमित्त दिल्ली इथं आयोजित राष्ट्रीय कार्यक्रमात पंचामृत जैविक्रावणाचं सादरीकरण केलं होतं. त्यावेळी उपस्थित असलेल्या राष्ट्रीय नवप्रवर्तन फाउंडेशनच्या तज्ज्ञ पथकांना ह्या द्रावणाची सविस्तर माहिती घेतली. तसंच त्याचे नमुने तपासणीसाठी संकलित केले. त्यानंतर अहमदाबाद-गांधीनगर येथील फाउंडेशनच्या संशोधन केंद्राच्या नमुन्यांची वैज्ञानिक पडताळणी करण्यात आली. तपासणी दरम्यान पंचामृत हे वनस्पतींच्या वाढीस चालना देणारे, पिकांच्या विकासासाठी उपयुक्त आणि शेतीसाठी महत्त्वाचं जैविक्रामण असल्याचा निष्पन्न झालं. यानंतर राष्ट्रीय नवप्रवर्तन फाउंडेशन ना या नवकल्पनेची अधिकृत नोंदणी करून तिला राष्ट्रीय स्तरावरील मान्यता प्रदान केली, अशी माहिती रवींद्र मेटकर यांनी दिली.

# नागपूरहून चोरी केलेली शिवाई बस अमरावतीत जप्त

## आंतरराज्यीय बसचोर राजापेठ पोलिसांच्या जाळ्यात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती –**
इमामवाडा बस स्थानकातून चोरीला गेलेली शिवाई बस अवघ्या काही तासांत शोधून काढत राजापेठ पोलिसांनी आंतरराज्यीय बसचोराला अटक केली. आरोपीकडून सुमारे १ कोटी ५३ लाख रुपये किमतीची बस जप्त करण्यात आली असून पुढील कारवाईसाठी आरोपीला नागपूर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

राजापेठ पोलीस ठाण्याचे बीट मार्शल नापोकाँ सारंग आदमणे व विजय धुर्वे यांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार, नागपूरच्या इमामवाडा बस स्थानकातून चोरीला गेलेली शिवाई बस (क्र. चक-४९-इक-८२५८) नंदा



मार्केट परिसरात उभी असल्याची माहिती मिळाली. तसेच बस चोरणारा संशयित गद्रे चौक परिसरात असल्याचे समजताच बीट मार्शल व राजापेठ डीबी पथकाने तत्काळ कारवाई करून बससह संशयिताला ताब्यात घेतले.चौकशीत आरोपीने आपले नाव विष्णू गणपती नीलावर (वय २३), रा. ढईत नगर, जि. रंगारेड्डी (तेलंगणा)



असे सांगितले. त्याने १ जुलै रोजी पहाटे सुमारे १ वाजता इमामवाडा बस स्थानकातून ही बस चोरी केल्याची कबुली दिली.पोलिसांच्या चौकशीत आरोपीने धक्कादायक खुलासे केले. तेलंगणा, हैदराबाद आणि आंध्र प्रदेशातील मिळून सुमारे २० बसेस चोरी केल्याची, तसेच नांदेड बस डेपोतूनही बस चोरी केल्याची कबुली त्याने दिली. नांदेडच्या वजीराबाद पोलीस ठाण्यात तसेच आंध्र प्रदेशातील तिरुमला सीसीएस पोलीस ठाण्यात त्याच्याविरुद्ध बस चोरीचे गुन्हे दाखल असल्याची माहितीही समोर आली.आरोपीची कार्यपद्धतीही वेगळी असल्याचे तपासात उघड झाले. तो चोरी केलेल्या बसमधील बॅटरी, टायर, डिस्क यांसारखे महत्त्वाचे सुटे भाग काढून त्यांची विक्री करत असे, तर उर्वरित बस जागेवरच सोडून देत असल्याचे त्याने सांगितले.जप्त करण्यात आलेल्या बस चोरीप्रकरणी नागपूरच्या गणेशपेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल असून आरोपी व जप्त मुद्देमाल पुढील तपासासाठी गणेशपेठ पोलिसांच्या ताब्यात देण्यात आला आहे.ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त श्याम घुगे आणि सहायक पोलीस आयुक्त संजय खताळे यांच्या मार्गदर्शनाखाली राजापेठ पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण व पोलीस निरीक्षक (गुन्हे) उमेश मुंडे यांच्या नेतृत्वात करण्यात आली. सपोनि नितीन शिंदे, बीट मार्शल सारंग आदमणे, विजय धुर्वे तसेच डीबी पथकातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी ही उल्लेखनीय कारवाई यशस्वी केली.

# सचिन आलेत, आता त्यांची क्रिकेट टीमही येणार

### ऑपरेशन टायगरवर बच्चू कडूंचा दावा, संजय राऊतांवरही जोरदार हल्लाबोल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२मुंबई –** राज्याच्या राजकारणात सध्या सुरू असलेल्या सत्तानाट्य आणि नेत्यांच्या पक्षांतरावर शिवसेनेचे नेते आणि आमदार बच्चू कडू यांनी अत्यंत खळबळजनक दावे केले आहेत.

विधान परिषदेचे आमदार सचिन अहिर यांच्या शिवसेना प्रवेशावर बोलताना बच्चू कडू यांनी खासदार संजय राऊत यांच्यावर थेट आणि अत्यंत शेलक्या शब्दांत हल्लाबोल केला आहे. ठाकरे गटावर आज जी बिकट वेळ आली आहे, त्याला केवळ राऊतच जबाबदार असल्याचा घणाघात त्यांनी केला.

**‘सचिन आले, आता त्यांची क्रिकेट टीमही येणार’**

सचिन अहिर यांनी नुकताच ठाकरे गटाला जय महाराष्ट्र करत एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश केला. यावर प्रतिक्रिया देताना बच्चू कडू यांनी खास आपल्या शैलीत टोलेबाजी केली. ते म्हणाले, सध्या फक्त सचिन आले आहेत, लवकरच त्यांची संपूर्ण क्रिकेट टीमही इकडे (शिंदे गटात) येणार आहे. या विधानातून त्यांनी ठाकरे गटातील आणखी काही मोठे नेते आणि आमदार शिंदे गटाच्या वाटेवर असल्याचे स्पष्ट संकेत दिले आहेत.

### ■ संजय राऊतांवर थेट निशाणा; ‘फक्त मारायचं राहिलंय’




संजय राऊत यांच्यावर अत्यंत बोचरी टीका करताना कडू यांनी एक मोठा गौप्यस्फोट केला. संजय राऊतांना उद्धव ठाकरेंनी खूप झापलं आहे, आता फक्त त्यांना मारायचं तेवढं बाकी राहिलंय, असे विधान त्यांनी केले. तसेच, शिवसेनेवर आणि पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्यावर आज जी काही परिस्थिती ओढवली आहे, ती सर्वस्वी केवळ संजय राऊत यांच्यामुळेच आली असल्याचा दावाही बच्चू कडू यांनी केला. ते एका वृत्तवाहिनीशी बोलत होते.

# MPSC ऑनलाइन परीक्षेला विद्यार्थ्यांचा तीव्र विरोध

## जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य मोर्चा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती**
अमरावती येथे महाराष्ट्र लोकसेवा आयोग स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांनी गुरुवारी जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य मोर्चा काढत ऑनलाइन परीक्षा पद्धतीला तीव्र विरोध दर्शविला. मोठ्या संख्येने सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी शासन आणि चझडउ आयोगाविरोधात घोषणाबाजी करत आपल्या मागण्या प्रशासनासमोर मांडल्या.विद्यार्थ्यांचे म्हणणे आहे की, चझडउ आयोगाने परीक्षा ऑनलाइन न घेता पूर्वीप्रमाणे ऑफलाइन पद्धतीनेच घ्यावी. ऑफलाइन परीक्षा



अधिक पारदर्शक, विश्वासार्ह आणि सर्व विद्यार्थ्यांसाठी समान संधी उपलब्ध करून देणारी असल्याचा दावा त्यांनी केला. ऑनलाइन परीक्षा पद्धतीमुळे तांत्रिक अडचणी, सर्व्हर समस्या आणि गैरप्रकारांना वाव मिळू शकतो, अशी भीतीही विद्यार्थ्यांनी व्यक्त केली.यापूर्वी ज्या पद्धतीने ऑफलाइन परीक्षा यशस्वीपणे पार पडल्या, त्याच पद्धतीचा अवलंब आगामी परीक्षांसाठीही करावा, अशी मागणी आंदोलकांनी केली. आपल्या मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांमार्फत राज्य शासन आणि चझडउ आयोगाकडे पाठविण्यात आले. विद्यार्थ्यांच्या या आंदोलनामुळे जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात काही काळ तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले होते. मात्र, पोलिस बंदोबस्तात मोर्चा शांततेत पार पडला.

# समृद्धीवर थांबलेली वाहने बनली संकट

## सुरक्षित प्रवासावर घोंगावते अपघाताचे सावट

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती–** देशातील सर्वांत आधुनिक आणि वेगवान महामार्गांपैकी एक असलेल्या समृद्धी महामार्गावर वेगाइतकाच वाहनधारकांचा निष्काळजीपणाही वाढत असल्याचे वास्तव आहे. महामार्गाच्या कडेला बिनधास्त उभे केलेले ट्रक, कंटेनर आणि कार हेच आता भरधाव वाहनांसाठी ‘मृत्यूचे सापळे’ बनत आहेत. धामणगाव रेल्वेजवळ अशाच एका उभ्या वाहनामुळे नुकताच पाचजणांचा दुर्दैवी मृत्यू झाला. एवढी भीषण दुर्घटना घडूनही परिस्थितीत कोणताही बदल झालेला नाही.

नुकताच समृद्धी महामार्गाच्या प्रत्यक्ष पाहणीतून धक्कादायक वास्तव समोर आले. संपूर्ण प्रवासात सरासरी दर १५ मिनिटांनी रस्त्याच्या कडेला ट्रक



किंवा कार उभी असल्याचे दिसले. बहुतांश वाहनांजवळ कोणतेही सुरक्षा संकेत नव्हते, तर कारंजा लाड आणि दुसरबीड परिसरात रॉंग साइडने वाहने धावत असल्याचेही निदर्शनास आले.

अलीकडेच धामणगाव रेल्वेजवळ अशाच प्रकारे रस्त्यावर उभ्या असलेल्या वाहनामुळे झालेल्या भीषण अपघातात पाचजणांना प्राण गमवावे लागले.

या घटनेनंतर महामार्गावर विशेष मोहीम राबविली जाईल, अशी अपेक्षा होती. मात्र, प्रत्यक्षात परिस्थितीत कोणताही लक्षणीय बदल झालेला दिसत नाही.

सरासरी दर १५ मिनिटांनी एखादा ट्रक, कंटेनर किंवा कार रस्त्याच्या कडेला उभी असल्याचे दिसले. अनेक वाहनचालक विश्रांतीसाठी, फोनवर बोलण्यासाठी, मालाची तपासणी करण्यासाठी किंवा किरकोळ कारणांसाठी वाहने थेट शेवटच्या लेनमध्ये उभी करत असल्याचे दिसून आले. काही वाहनांना किरकोळ बिघाड असला, तरी त्यासाठी कोणतीही सुरक्षा व्यवस्था करण्यात आलेली नव्हती.

महामार्गावरील सर्वात धोकादायक बाब, म्हणजे काही ठिकाणी वाहनांच्या रांगाच लागलेल्या होत्या.

विशेषतः छत्रपती संभाजीनगर, कारंजा लाड, जालना, देऊळगावराजा, शिर्डीजवळ एकामागून एक उभे असलेले ट्रक पाहायला मिळाले. त्यामुळे त्या लेनचा मोठा भाग व्यापला जात होता. अशा वेळी एखाद्या वाहनाला अचानक थांबण्याची वेळ आली किंवा चालकाचे नियंत्रण सुटले, तर अपघात अटळ ठरू शकतो.

### ■ टँकरच्याही होत्या रांगा...

महामार्गाच्या कडेला विनासुरक्षा उभे असलेले ट्रक, कंटेनर, कार आणि इतर वाहने अक्षरशः प्रत्येक काही किलोमीटरवर दिसून आली. काही ठिकाणी एक-दोन नव्हे, तर दहा-दहा ट्रकच्या रांगा लागल्या होत्या. धक्कादायक बाब म्हणजे अनेक वाहनांजवळ ना चेतावणी फलक, ना रिफ्लेक्टर, ना हॅझर्ड लाइट सुरू असल्याचे आढळले.

# ९ जुलैला राज्यव्यापी शाळा बंद आंदोलन

## शिक्षक संघटनांचा इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती :**शिक्षक अभियोग्यता परीक्षा (ढएढ) नियमांमुळे निर्माण झालेली सेवा अस्थिरता, पदोन्नती प्रक्रियेतील अडथळे, संचमान्यता धोरण आणि बीएलओ (इङ्ज) नियुक्तीच्या विरोधात राज्यातील प्रमुख शिक्षक संघटनांनी ९ जुलै २०२६ रोजी राज्यव्यापी शाळा बंद आंदोलनाची घोषणा केली आहे. शिक्षक सामूहिक रजेवर जात शाळा बंद ठेवणार असून मुंबई येथे धरणे आंदोलनही करण्यात येणार आहे.महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक मध्यवर्ती संघटना, शिक्षक संघटना समन्वय समिती, महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती, महाराष्ट्र ढएढ/उढएढ उत्तीर्ण शिक्षक कृती समिती, महाराष्ट्र राज्य खाजगी शाळा शिक्षक संघटना, शैक्षणिक व्यासपीठ, मुख्याध्यापक संघ आदी संघटनांनी संयुक्तपणे




आंदोलनाची हाक दिली आहे. याबाबत शासनाला पूर्वसूचना देण्यात आली आहे.शिक्षक संघटनांनी शिक्षण संचालकांनी सुरू केलेली विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख व मुख्याध्यापक पदोन्नती प्रक्रिया तातडीने स्थगित करून संबंधित आदेश रद्द करण्याची मागणी केली आहे. तसेच २०१० पूर्वी सेवेत रुजू झालेल्या शिक्षकांना ढएढ नियमांत शिथिलता देऊन किमान ४० टक्के गुणांची अट लागू करावी किंवा स्वतंत्र समकक्ष पात्रता परीक्षा घ्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.याशिवाय सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधीन राहून पात्र सेवाज्येष्ठ शिक्षकांना पदोन्नतीची संधी द्यावी, १५ मार्च २०२४ चे संचमान्यता धोरण रद्द करावे आणि प्राथमिक शिक्षकांना बीएलओसह सर्व अशैक्षणिक कामांतून पूर्णपणे मुक्त करावे, अशीही मागणी करण्यात आली आहे.शासनाने या न्याय्य मागण्यांवर तातडीने सकारात्मक निर्णय न घेतल्याने शिक्षकांमध्ये तीव्र नाराजी असून ९ जुलैच्या आंदोलनामुळे राज्यातील शैक्षणिक कामकाज विस्कळीत झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी शासनाची राहील, असा इशारा महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक मध्यवर्ती संघटनेने दिला आहे. ही माहिती महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचे राज्य प्रसिद्धी प्रमुख राजेश सावरकर यांनी दिली.

# कोरड्या जूननंतर अखेर आनंदाची बातमी!

## जुलैच्या पहिल्या आठवड्यात अमरावती सह विदर्भात मुसळधार पावसाचा अंदाज

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२अमरावती**
जून महिना कमी पावसाचा व काहीसा कोरडा गेल्याने चिंतातूर झालेल्या शेतकरी व सामान्य नागरिकांसाठीही आनंदाची बातमी आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार जुलैच्या पहिल्या आठवड्यात संपूर्ण विदर्भात मध्यम ते मुसळधार पावसाची शक्यता आहे. काही जिल्ह्यात अति तीव्र पाऊस होण्याचाही अंदाज आहे.अमरावती वेधशाळेच्या निरीक्षणानुसार सध्या बंगालच्या उपसागरात तीव्र स्वरुपाचा कमी दाबाचा पट्टा तयार झाला आहे. खाडीतून आर्द्रतायुक्त वारे ओडिसा, छत्तीसगड होत विदर्भापर्यंत वाहत आहेत. त्या प्रभावाने विदर्भात ७ जुलैपर्यंत मध्यम ते मुसळधार पावसाची शक्यता आहे. पाहणीनुसार १ ते ३ जुलैदरम्यान विदर्भाच्या



काही जिल्ह्यात मुसळधार, तर सर्वत्र मध्यम तीव्रतेच्या पावसाची शक्यता आहे. ४ व ७ जुलै रोजी काही ठिकाणी अतितीव्र पाऊस होईल, असा अंदाज आहे. ६ जुलै रोजी सर्वच जिल्ह्यात मध्यम स्वरुपाचा पाऊस होईल. हा संपूर्ण आठवडा पावसाळी वातावरणात जाईल, असा दिलासादायक अंदाज आहे.

केरळपासून कोकणापर्यंत वेळेत दाखल झाल्यानंतरही महाराष्ट्राला मान्सूनने मोठी प्रतीक्षा करायला लावली. मात्र पुढे एल-निनोचा प्रभाव वाढल्याने मान्सूनला ब्रेक लागला. यंदा पाऊस येतो की नाही, अशीही भीती वाढली होती. मुंबईसह पश्चिम व मध्य महाराष्ट्राला १५ ते २० दिवस वाट पहावी लागली. त्यामुळे तिकडची धरणेही कोरडी पडल्याने चिंता वाढली होती. विदर्भातही आठ-दहा दिवस विलंबानेच मान्सूनचे आगमन झाले. पूर्व विदर्भातील बहुतेक धरणात समाधानकारक जलसाठा असला तरी कमजोर मान्सूनच्या अंदाजाने खबरदारीचा इशारा देण्यात आला होता. २३ जूनला मान्सूनच्या पावसाने विदर्भात जोरदार धडक देत वेगाने आगेकुच केल्याने सरासरी भरून निघेल, अशी अपेक्षा होती. मात्र त्यानंतर जूनचा शेवटचा संपूर्ण आठवडा कोरडा गेल्याने चिंतेचे ढग दाटले होते. धक्कादायक म्हणजे जून महिन्यात सरासरीपेक्षा ४० टक्के कमी पावसाची नोंद झाली.

**विदर्भात ऑरेंज अलर्ट–** आता राज्यातील बहुतांश भागांत जोरदार पाऊस पडत आहे आणि पावसाने संपूर्ण महाराष्ट्र व्यापला आहे. आज भारतीय हवामान विभागाने चंद्रपूर, भंडारा, वर्धा, नागपूर, अमरावती आणि अकोला या जिल्ह्यांसाठी ऑरेंज अलर्ट जारी केला आहे.

# समग्र शिक्षेच्या आंदोलनाला मोठे यश

## अधिसंख्य कर्मचाऱ्यांना कायम करण्याचा निर्णय

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२मुंबई :** समग्र शिक्षा संघर्ष समितीच्या नेतृत्वाखाली मुंबईतील आझाद मैदानावर गेल्या ११६ दिवसांपासून सुरू असलेल्या आंदोलनाला मोठे यश मिळाले असून, राज्य मंत्रिमंडळाने अधिसंख्य पदांवरील शिक्षक व कर्मचाऱ्यांना कायम करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. या निर्णयाचे राज्यभरातील शिक्षक व कर्मचाऱ्यांनी स्वागत करत आनंदोत्सव साजरा केला.शिक्षक महासंघाने आंदोलनाच्या सुरुवातीपासूनच समग्र शिक्षा संघर्ष समितीला जाहीर पाठिंबा दिला होता. नागपूरसह राज्यातील विविध ठिकाणी झालेल्या आंदोलनांनाही महासंघाने सक्रिय साथ दिली होती. निर्णय जाहीर झाल्यानंतर शिक्षक महासंघाचे अध्यक्ष चंद्रशेखर भोयर यांनी आझाद मैदानावर जाऊन पदाधिकारी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे गुलाल उधळून, पेढे वाटून अभिनंदन केले.या ऐतिहासिक निर्णयाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार चंद्रशेखर भोयर व्यक्त



करण्यात आले. शिक्षकांच्या न्याय्य मागण्यांचा सकारात्मक विचार करून शासनाने घेतलेला हा निर्णय स्वागतार्ह असल्याची भावना व्यक्त करण्यात आली.दरम्यान, आंदोलनादरम्यान निधन झालेल्या दोन शिक्षकांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. समग्र शिक्षा संघर्ष समितीच्या पदाधिकारी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या संयमी, लोकशाही मार्गाने झालेल्या संघर्षामुळे हे ऐतिहासिक यश मिळाल्याचे सांगत, शिक्षकांच्या न्याय्य हक्कांसाठी शिक्षक महासंघ भविष्यातही ठामपणे पाठीशी राहणार असल्याचा पुनरुच्चार करण्यात आला.–

# दोन सफाई कामगारांना मारहाण

## आरोपींच्या अटकेच्या मागणीसाठी कामगारांचे कामबंद आंदोलन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती :**
शहरातील प्रभाग क्रमांक ५ अंतर्गत द्वारका नगर परिसरात कर्तव्य बजावत असलेल्या अमरावती महानगरपालिकेच्या दोन सफाई कामगारांना काही नागरिकांनी मारहाण केल्याची घटना घडली. या घटनेनंतर संतप्त सफाई कामगारांनी तातडीने कामबंद आंदोलन पुकारत गाडगे नगर पोलीस ठाण्यासमोर ठिय्या आंदोलन सुरू केले. आंदोलनस्थळी महानगरपालिकेच्या घंटागाड्याही उभ्या करण्यात आल्या असून कामगारांनी जोरदार घोषणाबाजी केली.मारहाण करणाऱ्या आरोपींना



तात्काळ अटक करण्यात यावी, अशी ठाम मागणी आंदोलकांनी केली आहे. आरोपींवर कठोर कारवाई होईपर्यंत कामावर परतणार नसल्याची आक्रमक भूमिका सफाई कामगारांनी घेतली आहे. त्यामुळे शहरातील स्वच्छता व्यवस्थेवर परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.घटनेची माहिती मिळताच गाडगे नगर पोलीस ठाण्यात मोठ्या संख्येने सफाई कामगार जमा झाले. पोलिसांकडून संबंधित घटनेची चौकशी सुरू असून परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी बंदोबस्त वाढविण्यात आला आहे. दरम्यान, आरोपींवर त्वरित कारवाई करून कामगारांना न्याय द्यावा, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली आहे. या घटनेमुळे शहरात एकच खळबळ उडाली असून प्रशासन व पोलीस यांची भूमिका काय राहते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.